मुख्याध्यापकाचा १२ वर्षीय विद्यार्थिनीवर अत्याचार

मदत केलेल्या शिक्षकासह संशयित ताब्यात

घोटी | वार्ताहर

इगतपुरी तालुक्यातील टाकेद बुद्रुक येथे शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली. शाळेतील अल्पवयीन मुलीला मुख्याध्यापकाने घरकामाच्या नावाखाली स्वतःच्या घरी बोलावून अत्याचार केल्याची घटना घडली. मुख्याध्यापकाच्या या कृत्यात एका शिक्षकाने मदत केली. त्यामुळे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत गुन्हा नोंदवला आहे. तर संबंधित शिक्षण संस्थेने मुख्याध्यापक, शिक्षकाचे निलंबन केले आहे.

टाकेद बुद्रुक येथील एका शाळेत सहावीत शिकणाऱ्या १२ वर्षांच्या पीडित विद्यार्थिनीला शुक्रवारी (दि. ७) दुपारच्या सुमारास घरकामाच्या नावाखाली वर्गशिक्षक गोरख जोशी याने तुकाराम साबळेच्या सांगण्यावरून टाकेद बुद्रुक येथील मुख्याध्यापकाच्या राहत्या घरी नेले. मुख्याध्यापक तुकाराम साबळे याच्या घरातील कुटुंब गावातीलच एका लग्नासाठी साकूर फाटा येथे गेले होते. या संधीचा फायदा घेऊन तुकाराम साबळे याने सदर विद्यार्थिनीवर अत्याचार केला. यानंतर मुख्याध्यापक तुकाराम साबळेने पीडित मुलीला शाळेत पाठवून दिले. शाळेत पीडित मुलीने घडलेला हा प्रकार तिच्या काही मैत्रिणींना सांगितला. पीडितेच्या मैत्रिणींनी ही घटना सांगितली. पीडित मुलीला त्रास होत असल्याचे कुटुंबाच्या लक्षात आल्यावर त्यांनी याबाबत विचारणा केली. विद्यार्थिनीने तिच्यावर मुख्याध्यापकाने केलेल्या अत्याचाराची आपबिती सांगितली. याबाबत शहानिशा झाल्यानंतर पीडितेच्या आजीने व काही पालकांनी सायंकाळी थेट घोटी पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार सांगितला. पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तक्रार दाखल करून पोलीस निरीक्षक विनोद पाटील, उपनिरीक्षक अजय कौटे यांनी रात्रीतून संबंधित मुख्याध्यापक तुकाराम साबळे व शिक्षक जोशी यांना अटक केली. अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचारानंतर टाकेद बुद्रुक येथील गावकऱ्यांनी कडकडीत बंद ठेवला होता. तसेच गावकऱ्यांनी शाळेत गर्दी केली होती. घटनेचा निषेध व्यक्त करून पालकांसह ग्रामस्थांनी कठोर कारवाईची मागणी केली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून शाळा परिसरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी पोलिसांनी गावकऱ्यांशी चर्चा करत योग्य कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर जमाव शांत झाला. घटनेची माहिती मिळताच शाळेच्या संस्था चालकांनी घटनास्थळी दाखल होत मुख्याध्यापक व एका शिक्षकाला निलंबित केल्याची माहिती ग्रामस्थांना आणि पोलिसांना दिली.

शिक्षणमंत्र्यांचे कारवाईचे निर्देश

इगतपुरी तालुक्यातील टाकेद बुद्रुक येथे १२ वर्षीय विद्यार्थिनीसोबत मुख्याध्यापकाने वर्गशिक्षकाच्या मदतीने अतिप्रसंग केल्याची घटना शिक्षणमंत्र्यांनी गंभीरपणे घेतली आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षण विभागाला या प्रकरणातील दोषी शिक्षक व मुख्यध्यापकावर कारवाई करत सेवेतून बडतर्फ करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करत शिक्षक व मुख्याध्यापकास निलंबित केले आहे. तसेच या गुन्ह्याचा गंभीरपणे तपास करत आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही पोलीस अधीक्षक नाशिक यांना मंत्री भुसे यांनी दिले आहेत.

गोळीबाराचा उलगडा होईना?

अद्याप सीसीटीव्ही फुटेजचीच पडताळणी; सराईत पसारच

नाशिक | प्रतिनिधी

म्हसरूळच्या कलानगर येथे बिल्डरच्या घरावर गोळीबार व दगडफेक केल्याच्या घटनेला २४ तास उलटले तरी हा प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न कुणी व का केला हे समोर आलेले नाही. म्हसरूळ पोलिसांची दोन पथके सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करत असून दुसरे पथक टवाळखोर, सराईतांची झाडाझडती घेत आहे. त्यामुळे गुन्ह्याच्या तपासात अद्याप प्रगती नसून सीसीटीव्ही फुटेजवरच तपास पथकाची भिस्त आहे. दरम्यान, गोळीबारानंतर मिळालेली पुंगळी एअरगनची असल्याचा दावा पोलिसांनी पुनश्च केला आहे.

दिंडोरीरोडवरील कलानगर लेन नंबर पाचमधील साईदर्शन रो हाऊसमध्ये साई अंगद उमरवाल (६९) हे कुटुंबासह राहतात. ते सेवानिवृत्त असून त्यांचा मुलगा बांधकाम व्यावसायिक आहे. दरम्यान, ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्री कुटुंब घरात झोपेत असताना तीन ते चार टवाळखोरांसह काही संशयितांनी त्यांच्या मुलाची कार टार्गेट करून दगडफेक करत काचा फोडल्या होत्या. मद्यपी व टवाळखोर असल्याने त्यांनी दुर्लक्ष करत दुसऱ्या दिवशी रिपेअरिंगसाठी कार गॅरेजला रवाना केली होती. त्यानंतर या घटनेची माहिती म्हसरूळ पोलिसांना कळवली होती. या घटनेनंतर शुक्रवारी (दि. ७) पहाटे साडेचार ते पावणेपाच वाजता तिघे संशयित तोंडाला रुमाल लावून दुचाकीवरून आले. त्यांनी उमरवाल यांच्या घरासह आजूबाजूचा कानोसा घेत एकाने दुचाकी मुख्य रस्त्यावर पार्क केली. यानंतर दोघे संशयित चालत आल्यावर संशयिताने उमरवाल यांच्या घराबाहेर उभे राहत सॅगमधील गावठी कट्टा काढून उमरवाल यांच्या घराच्या दिशेने हवेत एक राऊंड फायर केला व दुसऱ्याने दगड भिरकावला. यानंतर तिघांनी काही क्षणात पळ काढला. दरम्यान, याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून सखोल तपास सुरू आहे.

आर्थिक वाद की खंडणीसाठी धमकी?

उमरवाल यांचा मुलगा बांधकाम व्यावसायिक असून तो जमीन खरेदी-विक्रीचे काम करतो. तसेच कुणाशी नवे-जुने वादही नाहीत, असे कुटुंबाने म्हटले आहे. त्यामुळे त्यांना धमकावण्यासह खंडणी उकळण्यासाठी किंवा व्यावसायिक व्यवहाराच्या कारणातून संशयित टोळीने हे दोन हल्ले केले आहेत का की अन्य काही वैयक्तिक कारण आहे, यादृष्टीने पोलीस तपास करत आहेत.

युनिसेफ पथकाची नाशिक जिल्ह्यात भेट

कुपोषण निर्मूलनासाठी केलेल्या उपायांची पाहणी

नाशिक | नाशिक जिल्ह्यात महिला व बालविकास विभागाच्या वतीने कुपोषण निर्मूलनासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची युनिसेफ पथकाच्या वतीने पाहणी करण्यात आली.

यावेळी सदर पथकाने एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प त्र्यंबकेश्वरअंतर्गत सामुंडी विभागातील कोजुली अंगणवाडी केंद्रास युनिसेफ पथकाने भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यानंतर सामुंडी येथे आरंभअंतर्गत पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या पालक मेळाव्यात युनिसेफ पथकाने पालकांशी संवाद साधला. सामुंडी येथे भेट दिल्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात कुपोषण निर्मूलनासाठी राबवण्यात येणाऱ्या किलबिल मेळाव्यांबाबत चर्चा करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय सर्व विभाग व त्यांच्या योजना यांच्या समन्वयातून आकांक्षित तालुका सुरगाणा या ठिकाणी किलबिल मेळाव्याबाबत माहिती देत यामध्ये कुपोषित बालकांच्या पालकांना पशुसंवर्धन विभागमार्फत कोंबडीवाटप करण्यात आल्याचे सांगितले. प्रत्येक तालुक्यात किलबिल मेळावे आयोजित करण्यात आल्याचे सांगत त्यातून कुपोषणामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रभावी अमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या उपक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. कुपोषण निर्मूलनासाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमांबाबत युनिसेफच्या राजलक्ष्मी नायर यांनी कौतुक केले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, राजलक्ष्मी नायर, मेरी क्लाऊड, संजय सिंग, समीर पवार, संजय प्रभू, नितीन वसईकर, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील आदी उपस्थित होते.

कार्तिकेय नगरात घरफोडी

नाशिक | आयटीआय- डीजीपीनगर लिंकरोडवरील कार्तिकेयनगर येथील बंद घराचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी सव्वादोन लाखांचे दागिने चोरून नेत घरफोडी केली. अनिरुद्ध अविनाश कनोरे (३९, रा. साफल्य, कार्तिकेयनगर) यांच्या फिर्यादीनुसार, दि. ४ ते ६ तारखेदरम्यान ते बाहेरगावी गेले असता, चोरट्यांनी संधी साधून मुख्य दरवाजाचे सेफ्टी लॉक व कडीकोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी २ लाख २० हजारांचा ऐवज चोरून नेला. यात ९० हजारांच्या सोन्याच्या बांगड्या, ६० हजारांची सोन्याची चेन, ६० हजारांची सोन्याची अंगठी व १० हजारांची रोकड असा ऐवज चोरून नेला.

विदेशी मद्यासह एक कोटीचा मुद्दमाल जप्त

येवला | वार्ताहर

राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने कोपरगाव-येवला रोडवर पिंपळगाव जलाल शिवारात सापळा रचून अवैधरीत्या वाहतूक होत असलेला विदेशी मद्य, कंटेनरसह एक कोटीचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाईत संशयित वाहनचालक शंभुसिंह भेरुसिंह राजपूत (३३, रा. मु. बस्सी पो. सिधावत, ता.सलंबर, जि. उदयपूर, राजस्थान) याला ताब्यात घेतले आहे. जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये विदेशी मद्याचे ११४१ बॉक्स, आयशर कंपनीचा ट्रक, (क्र. एमएच-२० इएल-६७९१), एक मोबाईल संच असा एकूण १ कोटी ७ लाख ७२ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, पकडण्यात आलेल्या वाहनाचा मालक व संशयित फरार झाला आहेत.

पोलीस असल्याचे सांगून गंडा

नाशिक | अशोका मार्ग येथे पादचारी वयोवृद्धाला पोलीस असल्याची बतावणी करून हातचलाखीने त्यांच्याकडील सोन्याची अंगठी व चेन लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला. अशोक लक्ष्मण गायकवाड (७५, रा. गणेश्री बंगला, कल्पतरुनगर, अशोकमार्ग) यांच्या फिर्यादीनुसार, ते मंगळवारी (दि. ४) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास कल्पतरुनगरमधील कॉलनी रस्त्याने पायी जात होते. त्यावेळी दोन दुचाकींवरून हेल्मेट घातलेले दोघे संशयित त्यांच्याजवळ आले आणि त्यांनी आम्ही पोलीस डिपार्टमेंची माणसे असून, या भागात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्याकडील दागिने काढून ठेवा आणि घरी जा असे सांगितले. त्यासाठी संशयितांनी त्यांच्या अंगावरील दागिने काढण्यास सांगितले. गायकवाड यांनी त्यांच्या हाताच्या बोटातील २४ हजारांची अंगठी, ४५ हजारांची सोन्याची चेन, हातातील घड्याळ असे दागिने काढले असता संशयितांनी त्यांना खिशातील रुमाल देण्यास सांगितले. त्यावेळी संशयितांनी अंगठी, चेन व घड्याळ त्या रुमालात बांधून त्यांच्याकडे दिले. मात्र घरी आल्यानंतर रुमाल उघडून पाहिले असता त्यात फक्त घड्याळ होते. सोन्याचे दागिने चोरट्यांनी हातचलाखीने लंपास केले होते. मुंबईनाका पोलीस तपास करत आहेत.

डंपरच्या धडकेत वृद्ध ठार

दे.कॅम्प | देवळाली कॅम्प येथील केंद्रीय विद्यालयासमोर भरधाव डंपरच्या धडकेत ६५ वर्षीय वृद्ध ठार झाला. परशुराम नितीन शिंदे (रा. गुजरनगर, थेरगाव, पुणे, सध्या रा. चारणवाडी, देवळाली कॅम्प) असे संशयित डंपर चालकाचे नाव असून, अपघातात लक्ष्मण वाळू शिरोळे (रा. दोनवाडे, ता नाशिक) यांचा मृत्यू झाला. गणेश बाळासाहेब शिरोळे यांच्या फिर्यादीनुसार, शुक्रवारी (दि. ७) दुपारी दोनच्या सुमारास डंपरने (एमएच १५ जेसी ११३) समोरून धडक दिली. देवळाली कॅम्प पोलिसात गुन्हा दाखल आहे.

चंद्रशेखर वाड कायम स्मरणात राहतील : प्रा.फडके

नाशिक | एकमेकांशी तादात्म्य पावलेले, एकमेकांच्या सुखदुःखात कायमच समरस झाले. त्यामुळे अनंत आठवणी आहेत. मित्र किती जवळ असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्व. चंद्रशेखर वाड. नितळ, सहृदयी, प्रामाणिकपणा, कुशल प्रशासक, कौटुंबिक जिव्हाळा असलेले स्व. चंद्रशेखर वाड मित्र म्हणून अनेक रूपांच्या माध्यमातून कायमच स्मरणात राहतील, अशा शब्दात नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांनी पेठे विद्यालयात शोकसभेप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी व्यासपीठावर संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, अॅड. जयदीप वैशंपायन, कार्यवाह राजेंद्र निकम, माजी उपाध्यक्ष रमेश देशमुख, माजी कार्यकारी मंडळ सदस्य पांडुरंग अकोलकर, पेठे विद्यालयाचे मुख्याध्यापक भास्कर कर्डिले उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांनी स्व. चंद्रशेखर वाड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी अभिजित बगदे यांनी आपल्या मनोगतातून मृदू स्वभाव असलेले, शांततेत बोलणारे, संयमी, इंग्रजीचे उत्तम अध्यापक असल्याचे सांगून शोक व्यक्त केला.

माजी विद्यार्थी भालचंद्र पाटील यांनी आपल्या मनोगतातून प्रकाश मालवल्याची भावना, माणुसकी असलेले संवेदनशील शिक्षक यांच्याकडून ज्ञानाचा उत्सव अनुभवला. शिक्षण हे केवळ पुस्तकी नसून आत्म्याला स्पर्श करणारे असावे, असे सर नेहमी सांगत. सरांनी तीन पिढ्यांना ज्ञानामृत पाजले. विनायक येवले या माजी विद्यार्थ्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांबरोबरच मित्रत्वाचे नाते जपणारे वाड सर होते. माजी कार्यवाह शशांक मदाने यांनी आपल्या मनोगतातून संस्थेची विशिष्ट पद्धत ही फक्त वाड सरांना माहिती होती. ते एक दिग्गज व्यक्तिमत्त्व होते, असे सांगितले. दिलीप अहिरे यांनी आपल्या मनोगतातून दांडगी स्मरणशक्ती असलेले तसेच इंग्रजीवर प्रभुत्व असलेले अतिशय प्रामाणिक व विश्वासू असे वाड सर होते. माजी विद्यार्थी देवदत्त जोशी यांनी शाळेतील बालपणीच्या आठवणी सांगितल्या. विश्वास बोडके यांनी सांगितले की, ३०/ ४० वर्षे आम्ही एकत्र काम केले तसेच शंभर टक्के माहिती असलेले ते सहकारी मित्र होते. प्रेमळपणा, व्यवस्थित लिखाण तसेच सहकार्य करणारा मित्र गमावल्याची भावना व्यक्त केली. पांडुरंग अकोलकर म्हणाले की, कुटुंबवत्सल, मृदू स्वभाव असलेले, अध्यात्मात विशेष रस असलेले वाड सर यांचे निधन झाले. खरोखर काळाने सूड उगवला, अशा भाषेत आपल्या भावना व्यक्त केल्या. माजी उपाध्यक्ष रमेश देशमुख यांनी कौटुंबिक पार्श्वभूमी सांगून संस्था व्यवस्थापनात विशेष योगदान वाड सरांनी दिले असे सांगितले. प्राजक्ता क्षीरसागर यांनी उत्सव समितीचे कामकाज करत असताना आलेले अनुभव व सरांचे मार्गदर्शन विशद केले.

संस्थेचे कार्यवाह राजेंद्र निकम म्हणाले की, संस्थेचा व शिक्षण व्यवस्थेचा चालता बोलता कोश म्हणजे वाड सर. अनेक गोष्टी मी सरांकडून शिकलो, असे सांगून त्यांनी दुखवट्याचा ठराव मांडला. सूत्रसंचालन शैलेश पाटोळे यांनी केले. याप्रसंगी कार्यकारी मंडळ सदस्य मोहन रानडे, रंजना परदेशी, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, उमेश कुलकर्णी, पंढरीनाथ बिरारी, लक्ष्मण जाधव, दिलीप अहिरे, कर्नल देशपांडे, सुभाष सूर्यवंशी, रामदास हिरे, सुरेश राका, चंद्रकांत भालेराव, के. डी. चौधरी, अशोक कोठावदे, माजी विद्यार्थी, कार्यकारी मंडळ सदस्य, शिक्षक मंडळ सदस्य, संस्थेच्या विविध शाळांमधील पदाधिकारी, शिक्षकवृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्लासिफाईड/सुपरमार्केट

भाड्याने देणे

ऋषीराज रिजन्सी अपार्टमेंटमधील ५वा मजला, विद्या विकास सर्कल, नाशिक १३८.४५ स्के.मी. + २ कार पार्किंग, ४७.३८ ओपन टेरेस भाड्याने देणे आहे. मो. 8975839835. (8/02-BK-9862)

मुंबई नाका, संदीप हॉटेलजवळ बिझनेस बे मध्ये कमर्शिअल शॉप (११८.७८ स्के.मीटर) २ पार्किंग प्रत्येकी ३रा मजला-शॉप नं. २३, ५वा मजला - शॉप नं. ५६ भाड्याने देणे आहे. 7447490085. (8/02-BK-9861)

अशोकस्तंभ, घारपुरे घाटावरील रिव्हर व्ह्यू बिल्डींगमध्ये तळमजला (४०.२५ स्के.मीटर) व ग्राऊंड फ्लोअर (३७.३६ स्के.मीटर) चे दोन शॉप भाड्याने देणे आहे. 7447490085. (8/02-BK-9861)

जाहिरात छोटी! किमया मोठी!!

खरेदी/विक्री

2 BHK रेडीपझेशन फ्लॅट विकणे - अथर्व रेसिडेन्सी, त्रिकोणी गार्डनजवळ, काठे गल्ली, नाशिक. 9823488837. (11/02-BK-9585)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalvenashamuktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/CRG00556)

वर पाहिजेत

वर पाहिजे - सुंदर वधू, वय २७, उंची ५'-३'', शिक्षण १२वी, मेहंदीचे क्लासेस घेते, प्रति महा १२०००/-. मुलीला आई वडील नाही. काका काकूकडे राहते. अपेक्षा : निर्व्यसनी, समजूतदार वर हवा. जातीची वयाची अट नाही. त्वरित विवाह. ७५१७५९०५२४. (BK-9907)

नावात बदल

My old name Ibrahim Khujemabhai has been changed to my new name Ibrahim Kuzema Lokhandwala as per Aadhar No. 6578 8242 1221. (BK-9950)

My old name Sayyed Khurshid Alam has been changed to my new name Khurshid Alam Noorislam Saiyyed as per Aadhar. 7398 7940 1031. (BK-9951)

जाहिरात छोटी! किमया मोठी!!

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६ ◆ **निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆**दिंडोरी :** दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ **मालेगांव :** पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆**सिन्नर :** दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

हेडक्वार्टरमधील घरे जीर्ण

शहर पोलिसांच्या दहा इमारती पाडणार

नाशिक | प्रतिनिधी

गंगापूररोडवरील नाशिक शहर पोलीस मुख्यालयातील कौलारू घरे असलेल्या चाळींसह काही निवासी इमारती धोकादायक व जीर्ण झाल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'स्ट्रक्चरल ऑडिट'मधून समोर आले आहे. त्यानुसार पोलीस मुख्यालयाचे उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांनी एकूण १३ धोकेदायक चाळींसह १० इमारती तातडीने खाली करण्याचे आदेश संबंधित पोलीस अंमलदारांना दिले आहेत.

पोलीस आयुक्तालयाशेजारी असलेल्या पोलीस मुख्यालयाच्या जागेत कर्मचाऱ्यांसाठी मुख्य शासकीय वसाहत आहे. तिथे कौलारू घरांच्या चाळींसह जुन्या दुमजली इमारती आहेत. या ठिकाणासह स्नेहबंधन पार्क, देवळाली कॅम्प, नाशिकरोड व पाथर्डी फाटा येथील काही इमारती खराब झाल्या आहेत. ऑगस्ट २०२३ मध्ये आयुक्तालयाने बांधकाम विभागाला इमारतींचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्यासंदर्भात पत्र दिले. ही कार्यवाही पूर्ण करून फेब्रुवारी २०२५ मध्ये बांधकाम विभागाने सविस्तर अहवाल आयुक्तालयाला दिला आहे. त्यानुसार मुख्यालयात संबंधित वास्तू पाडून त्या ठिकाणी नव्याने इमारतींसह बॅरेक उभारले जाणार आहेत. पुढील काही दिवसांत त्याला आरंभ होत आगामी सिंहस्थापर्यंत म्हणजे सन २०२६ च्या अखेरपर्यंत नवनिर्मिती पूर्ण करण्याचा आयुक्तालयाचा मानस आहे.

या इमारती करणार जमीनदोस्त...

पोलिस लाइन चाळ क्रमांक १ ते ५, पोलीस लाइन चाळ क्रमांक ६ ते ८, पोलिस लाइन चाळ क्रमांक ९ ते ११, पोलीस लाइन चाळ क्रमांक १२ व १४, जुनी इमारत क्रमांक २ व ४, जुनी इमारत क्रमांक ८, जुनी इमारत क्रमांक ९ ते ११, जुनी इमारत क्रमांक बी-१ ते बी -४ या इमारती जीर्ण झाल्या आहेत.

शहर पोलीस दल कार्यान्वित होण्यापूर्वीच गंगापूर रस्त्यावरील मुख्यालयात पोलिसांकरता कौलारू चाळ व इमारती बांधण्यात आल्या होत्या. ग्रामीण पोलीस दलानंतर शहरातील कर्मचाऱ्यांचेही तिथे वास्तव्य सुरू झाले. सन २००३ च्या सिंहस्थापूर्वी काही चाळी पाडून तिथे नवीन इमारती बांधण्यात आल्या. स्नेहबंधन पार्क या नवीन पोलीस वसाहतीचीही उभारणी झाली. आता सन २०२५ मध्ये सर्वच घरांचे 'ऑडिट' करून अहवाल सादर झाला आहे.

निधन वार्ता...

अनुसयाबाई परदेशी

आंबेदिंडोरी | येथील अनुसयाबाई हरिश्चंद्र परदेशी (९०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, सून, नातू, पणतू असा परिवार आहे. शंकरसिंग हरिश्चंद्रसिंग परदेशी यांच्या त्या मातोश्री होत.

धृपदाबाई पवार

मालेगाव | तालुक्यातील पिंपळगाव (दा.) येथील धृपदाबाई कारभारी पवार (८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी मुख्याध्यापक रमेश पवार, शिक्षक सुधाकर पवार, देवीदास पवार, शरद पवार यांच्या त्या आई होत.

तानाजी ठोके

मालेगाव | वडगाव येथील प्रगतिशील शेतकरी तानाजी भीमसिंग ठोके (पाटील) (५५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे. दै. 'देशदूत' मालेगाव कार्यालयातील उपसंपादक मगनसिंग पाटील यांचे ते चुलत बंधू होत.

इंदिरा जाधव

नाशिक | येथील इंदिरा काशिनाथ जाधव (९५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते रमेश जाधव यांच्या त्या काकू होत.

कैलास बुचडे

नाशिक | येथील महिंद्र ॲण्ड महिंद्र कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश ऊर्फ कैलास पाराजी बुचडे (६१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. महिंद्र कंपनीत ते बाबा बुचडे या नावाने लोकप्रिय होते. धनगर समाजाचे सामाजिक कार्यकर्ते दिलीप बुचडे यांचे ते कनिष्ठ बंधू होत.